# देगलूरमध्ये होणार लोकप्रशासन परिषदेचे अधिवेशन

## केंद्रीय मंत्री गडकरी यांना निमंत्रण



देगलूर : आडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या देगलूर महाविद्यालयात पुढील वर्षी म्हणजेच २०२४ च्या जानेवारीत लोकप्रशासन परिषदेचे चाळीसावे अधिवेशन होणार आहे. देशभरातील महाविद्यालयांच्या लोकप्रशासन विभागाचे विभाग प्रमुख, अधिष्ठाता, प्राध्यापक, संशोधक हे यासाठी येणार आहेत. लोकप्रशासन परिषदेच्या अधिवेशनाला उद्घाटक म्हणून केंद्रीय सडक निर्माण मंत्री नितीन गडकरी यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

लोकप्रशासन परिषदेच्या अधिवेशनास राष्ट्रीय स्तरावरून राज्यशास्त्र व लोकप्रशासन विषयाचे प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. या अधिवेशनाच्या माध्यमातून राज्यशास्त्र व लोकप्रशासन विषयातील मुलभूत संशोधन व संकल्पना, तसेच राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषय, समस्या व त्यांच्या उपायांवर चर्चा होते. आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, माजी अध्यक्ष देवेंद्र मोतेवार, कार्यकारिणी सदस्य गंगाधर जोशी आणि प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी नुकतीच नागपूर येथे नितीन गडकरी यांची भेट देऊन ३ राज्याच्या सीमेवर असलेल्या देगलूर महाविद्यालयाविषयी माहिती दिली. कांही वर्षांपूर्वी झालेल्या झालेल्या लोकप्रशासन परिषदेसंबंधी माहिती देत सन २०२४ च्या जानेवारीत होणाऱ्या परिषदेच्या अधिवेशनासाठी उद्घाटक म्हणून निमंत्रित केले आहे. गत अधिवेशनास महाराष्ट्राचे निवृत्त पोलीस महासंचालक अरविंद इनामदार हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

गडकरी यांनी आडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या शिष्टमंडळाचे निमंत्रण स्वीकारले असून येण्याचे कबूल केल्याचे प्रकाश पाटील बेम्बरेकर यांनी पुण्यनगरीशी बोलताना सांगितले. याबरोबरच देगलूर शहराला रिंगरोड व बायपास रस्ता केला जावा आणि हैदराबाद ते अकोला राष्ट्रीय महामार्गाचे तेलंगणातील काम पूर्ण झाले आहे. महाराष्ट्रातील नांदेड, हिंगोली, वाशीम या भागात प्रलंबित काम पूर्ण करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. देगलूर भागातील रस्त्यांसाठीच्या भूमी संपादनाची सद्यस्थिती अवगत करून त्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन गडकरी यांनी शिष्टमंडळाला दिले.

Scanned with OKEN Scanner